(251)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/२८/२०२१
दिनांक :- १४/०१/२०२१.

**"जाहिर नोटीस"**
**(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **"उपरोक्त अधिनियम"** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

आणि ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व एकूण ३१३०२.०० चौ.मी. क्षेत्र महाराष्ट्र शासनाच्या दि.११/०४/१९९१ रोजीच्या राजपत्रात पान.नं.८५७ मध्ये घोषित असलेने तसेच झोपटपट्टी निर्मुलन व पुनर्विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचेकडील झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती अहवाल प्राप्त असून मोजणी नकाशानुसार रस्त्यातंर्गत क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र ३३२६०.९८ चौ.मी. एवढ्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल असलेमुळे सदरचे एकूण ३३२६०.९८ चौ.मी. एवढे योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

**आणि ज्याअर्थी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील " असे नमूद केले आहे.**

आणि ज्याअर्थी, या नोटीसाद्वारे सोबत अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे नियोजन आहे.

त्याअर्थी, या अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी

स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३ यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|
| स.नं.१००(पै), सि.स.नं.६६१३/३(पै) विठ्ठलनगर, पिंपरी वाघेरे, पुणे | ३३२६०.९८ चौ.मी. (मोजणी नकाशानुसार रस्त्याअंतर्गत क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र) | **पुर्वेस** - लागू मौजे भोसरीची शीव, नाला<br>**पश्चिमेस** - स.नं.१००(पै), सि.स.नं. ६६१३/३(पै),१२.०मी. डि.पी.रोड<br>**उत्तरेस** - अण्णासाहेब मगर स्डेडियम, स.नं.१००(पै), सि.स.नं. ६६१३/३(पै)<br>**दक्षिणेस** - सि.स.नं.६५५१, ६५५२, ६६०९(पै), ६६१२, १२.० मी. डि.पी.रोड | मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स, ऑफिस नं.१-७, शौकम मंजिल, शितल हॉटेलजवळ, नेहरुनगर रोड, पिंपरी, पुणे -१८. |

सदरची नोटीस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

14.1.2021

**(राजेंद्र निंबाळकर)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वस प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १४/०१/२०२१